महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 18/10/2021 (सोमवार)
(दुपार)

---

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 18 कि.मी. अंतरावरील मौजा रामगीरी गावाजवळ येथे दि. 06/10/2021 चे 16.45 वा. दरम्यान एमएच– 31/डीजे– 1374 क्रमांकाची मोटरसायकलचा चालक/आरोपी नामे– श्रावण तुराजी खवशी वय 34 वर्ष, रा. चाकडोह त कळमेश्वर याने आपले ताब्यातील मोटरसायकल वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालविल्याने त्याची मोटरसायकल स्लीप होउन त्याच्या डोक्याला व हाताला मार लागला. या अपघातात श्रावण खवशी हा स्वताच्या मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस शिपाई मिलींद मोरे पो.स्टे. कळमेश्वर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री मेश्राम 9075245059 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कोंढाळी – दिनांक 12/10/2021 चे 15.00 वा. चे सुमारास पो.स्टे. कोंढाळी हद्यीत फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री राम ढगे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर